जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ३५०

## प्रेसनोट क्रमांक - ३०९ दिनांक -०५/०८/२०२४

समर्थ पोलीस स्टेशन,पुणे शहर

## कर्जाची परत फेड करण्यासाठी चोरल्या तब्बल १० दुचाकी,

समर्थ पोलीस स्टेशन हद्दीत दि.३१/०७/२०२४ रोजी फिर्यादी यांची स्प्लेंडर मोटरसायकल चोरी झाली होती व त्यांच्या तक्रारीवरून समर्थ पोलीस स्टेशन येथे गुरनं. १७१/२०२४ भा.न्या.सं.कलम ३०३(२) प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

सदर गुन्हयाचा तपास वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली समर्थ पोलीस स्टेशनकडील तपास पथकातील अधिकारी व अमंलदार करीत होते. दाखल गुन्हयातील चोरी झालेल्या मोटरसायकलचा शोध घेण्याकरीता तपास पथकाने गुन्हा घडल्याच्या ठिकाणापासुन सी.सी.टी.व्ही. कॅमेरे तपासुन तसेच पोलीस अंमलदार कल्याण बोराडे,शरद घोरपडे यांच्या गुप्त बातमीदाराकडुन मिळालेल्या माहीतीच्या आधारे समर्थ पोलीस स्टेशन हद्दीत गस्त करीत आरोपीचा मागोवा घेत असताना सारस्वत कॉलनी, सोमवार पेठ परीसरात एक इसम त्यांच्याकडे पाहुन संशयीतरीत्या त्याचे ताब्यातील मोटरसायकलवरुन पळुन जावु लागल्याने त्यास पाठलाग करुन सोबतचे पोलीस स्टाफच्या मदतीने समर्थ पोलीस स्टेशन येथे आणुन विश्वासात घेवून त्याचेकडे चौकशी केली असता सदर इसमाने त्याचे नाव **अरविंद मोतीराम चव्हाण वय ३९ वर्षे, रा.दौंड, जि.पुणे** असे सांगुन त्याच्या ताब्यातील मोटरसायकल शाहु उद्यान, सोमवार पेठ एस व्ही युनिअन शाळेसमोरून चोरी केली असल्याची कबुली दिली.

सदरची मोटरसायकल चोरीस गेलेबाबत समर्थ पो.स्टे.येथे गु.र.न.१७१/२०२४ प्रमाणे गुन्हा दाखल असल्याचे निष्पन्न झालेनंतर सदर इसमास दाखल गुन्हयात अटक करुन त्याचेकडे अधिक तपास केला असता आरोपीने त्याचेवर झालेल्या कर्जाची परतफेड करण्याकरीता यापुर्वी पुणे रेल्वे स्टेशन परीसरातील दुचाकी वाहनांची चोरी करुन दौंड परीसरातील लोकांना सदरची वाहने स्वताःचीच आहेत असे खोटे सांगुन विकली असल्याबाबत कबुली दिल्यानंतर आरोपीकडुन तब्बल १० दुचाकी जप्त करण्यात आल्या असुन यामध्ये बंडगार्डन पोलीस स्टेशन, पुणे व समर्थ पोलीस स्टेशन, पुणे येथील वाहन चोरीचे गुन्हे उघडकीस आले आहेत.

सदरची कामगिरी ही उप-आयुक्त,परि.३,पुणे अतिरिक्त कार्यभार परि-०१ पुणे श्री.संभाजी कदम, मा.सहा.पोलीस आयुंक्त,फरासखाना विभाग,श्रीमती.नुतन पवार, समर्थ पोलीस स्टेशनचे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. उमेश गित्ते, यांचे मार्गदर्शनानुसार तपास पथकातील पोलीस उप-निरीक्षक सुनिल रणदिवे, जालिंदर फडतरे, सहा. पोलीस फौज. संतोष पागार, पोलीस अंमलदार इम्रान शेख, रोहीदास वाघेरे, रविंद्र औचरे शिवा कांबळे, अमोल गावडे, रहीम शेख, शरद घोरपडे, कल्याण बोराडे,अविनाश दरवडे, अर्जुन कुडाळकर यांनी केली आहे.